सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


जा.क्रं./ प्रेस नोट /237/ पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 15/06/2025

# 1)जबरी चोरी :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 14.06.2025 रोजी 04.35 वा. चे सुमारास, **उदयनगर पाटीजवळ, वर्कशॉप आनंदनगर रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादीस अज्ञात तीन आरोपीतांनी मोटार सायकलवर येवून संगनमत करून त्यांचे जवळील एक मोटोरोला कंपनीचा मोबाईल किंमती 10,000/–रू व हातातील स्मार्ट वॉच किंमती 5,000/–रू असा एकुण 15,000/– रूपयाचा मुद्देमाल दुखापत करून जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी महेश माणिकराव जहागिरदार, वय 59 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत रा.भाग्यनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 336/2025 कलम 309(6), 311,3(5), बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/देशमुख, मो. नं. 9921533111** हे करीत आहेत. सदरचा गुन्हा उघडकीस आला असून गुन्हयातील आरोपींना अटक करण्यात आली असून मुद्देमाल जप्त करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

**2)लोहा :–** दिनांक 13.06.2025 रोजी 17.50 वा. चे सुमारास, **मौ. बोरगाव जिल्हा परीषद शाळेच्या गेट समोर, ता. लोहा जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. गोविंद त्र्यंबक पाटील 2. कल्याणराव साहेबराव पाटील दोघे रा. बोरगाव ता. लोहा जि.नांदेड हे संगनमत करून फिर्यादीस गावातील रस्ताचे काम कोणास विचारून करत आहेस, यापुढे गावात कोणतेही विकासाचे काम करायचे नाहीत. असे म्हणून शिवीगाळ करून थापडबुक्यांनी मारहाण करून फिर्यादीचे गळयातील सोन्याची दोन तोळयाची चैन बळजबरीने हिसकावून नेली. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अजित पुंडलिकराव पाटील, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती रा.बोरागाव ता.लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 168/2025 कलम 119(1),296,115,352,351(2),3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2536 राठोड, मो. नं. 9822630689** हे करीत आहेत.

# 2)प्राणी संरक्षण कायदा :–

**1)हिमायतनगर :–** दिनांक 14.06.2025 रोजी 08.30 वा. चे सुमारास, **बोरगडी ते हिमायतनगर जाणारे रोडवर बोरगडी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे मोहमद इरफान, रा. हिमायतनगर हा विना परवाना बेकायदेशीररित्या 02 गोवंश जातीचे जनावरे एकुण किंमत 33,000/–रूपयाचे कत्तल करण्याच्या उद्देशाने पायी घेवून जात असताना मिळून आल्याने त्यास गावकरी यांनी विचारपूस करत असताना जनावरे सोडून पळून गेला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1966 विजयकुमार बालाजीराव आहवुल, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 125/2025 कलम 5(बी),9 प्राणी संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1272 नागरगोजे,** मो. क्रं. 7083621700 हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर :–** दिनांक 14.06.2025 रोजी 18.25 वा. चे सुमारास, **बोरगडी ते हिमायतनगर जाणारे रोडवर रफीक फॉर्म हॉउस जवळ ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे शेख अमीन शेख ईस्माईल,वय 25 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. रहिम कॉलनी हिमायतनगर हा विना परवाना बेकायदेशीररित्या 01 गोवंश जातीची गाय किंमती 20,000/– रूपयाची कत्तल करण्याच्या उद्देशाने पायी घेवून जात असताना मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2204 बालाजी दादाराव पाटील, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 131/2025 कलम 5(बी),9 प्राणी संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401 जाधव,** मो.क्रं. 9850493110 हे करीत आहेत.

## 3)फसवणुक :-

**नायगाव :-** सन 2020 व दिनांक 26.07.2021 ते दिनांक 06.09.2021 दरम्यान, **रातोळी ग्राम पंचायत कार्यालय, रातोळी ता.नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी नामे 1. एस.जी.वडजे, तत्कालिन ग्रामसेवक ग्रामपंचायत, रातोळी 2. सुमनबाई पिराजी देशमुख, तत्कालीन सरपंच ग्रामपंचायत, रातोळी यांनी संगनमत करून ग्रामपंचायत अंतर्गत 15 व्या वित्त आयोग मधील 1. पाणीपुरवठा नळ जोडणी, 2. आपले सरकार सेवा केंद्र, 3. कच्चा रस्ता, 4. नाली दुरूस्ती, 5. सीसी नाली बांधकाम व दुरूस्ती काम, 6. सीसी रोडकाम, 7. शाळा दुरूस्ती काम 8. कॅम्पुटर दुरूस्ती असे कामे करण्यासाठी शासनाकडून देण्यात आलेल्या निधीतुन कामे न करता कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखवून खोटे कागदपत्र तयार करून ते खरे असल्याचे भासवून आरोपीतांनी संयुक्त स्वाक्षरी व डिजीटल स्वाक्षरी करून संगनमताने कट रचून गैरव्यवहार करून शासनाची 14,67,587/- रूपयाची फसवणुक करून अपहार केला. वगैरे **फिर्यादी शेख जाकीर शेख सगीर, वय 34 वर्षे,व्यवसाय (नगरसेवक न.प.अर्धापूर) तसेच संस्थापक अध्यक्ष, जनहित माहिती सेवा समिती महाराष्ट्र राज्य रा.बरकतपूरा ता.अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं. 124/2025 कलम 420,465,467,468,471,474,406,409,34,120(ब) भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/तोटावार, मो.नं. 8888802245** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड